16

अन्वेषण, चौकशी किंवा फौजदारी
गुन्ह्याबाबतचा खटला प्रलंबित असलेल्या
निलंबित शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रकरणांचा
आढावा घेण्यासाठी मार्गदर्शक तत्वे...

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय, क्रमांक निप्रआ -२००८/प्र.क्र.३/०८/११-अ
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,
दिनांक :-१४ मार्च, २००८.

वाचा :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीडीआर-१३९३/ प्र.क्र.७२/११-अ, दिनांक १४ डिसेंबर, १९९५.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र.सीडीआर-१३९६/ प्र.क्र.२२/११-अ, दिनांक १४ जून, १९९६.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीडीआर-१३९६/ प्र.क्र.६/०६/११-अ, दिनांक. २० जुलै २००६.
४) शासन निर्णय, क्रमांक सीडीआर -१३०७/प्र.क्र.३/०७/११-अ दिनांक :- १८ ऑक्टोबर,२००७.

**प्रस्तावना :-**

शासकीय सेवकाच्या निलंबनाचा आढावा घेण्याच्या अधिकाराचे नियमन संदर्भाधीन शासन निर्णयान्वये करण्यात आले असले तरी दिनांक २० जुलै, २००६ च्या शासन निर्णयातील याबाबतचे वर्गीकरण सर्वसाधारण स्वरुपाचे असून त्यामध्ये सुधारणा करण्याच्या मागण्या राज्यशासनाकडे प्राप्त झालेल्या आहेत. त्या सर्व मागण्यांचा साकल्याने विचार करुन निलंबनाचा आढावा घेण्याबाबत अधिक सुस्पष्टता आणण्याच्या दृष्टीने गट "क" व "ड" मधील निलंबित कर्मचा-यांबाबतचा आढावा घेण्याबाबतचे प्रस्ताव संबधित प्रशासकीय विभागाकडे न येता निलंबनाचा आढावा व पुन:स्थापना करण्याबाबतच्या अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे सुधारित कार्यपध्दती विहित करण्यात येत आहे.

23 2/5/08 EST -II

**शासन परिपत्रक :-**

शासकीय सेवकांच्या निलंबनाचा आढावा घेताना सामान्य प्रशासन विभागाचा दिनांक २० जुलै, २००६ व दिनांक १८ ऑक्टोबर, २००७ मधील मार्गदर्शक तत्वे विचारात घेऊन ज्या प्रकरणात शासन हे शिस्तभंग विषयक प्राधिकारी / नियुक्ती प्राधिकारी असेल अशी प्रकरणे मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील आस्थापना मंडळ क्र.१ मार्फत मा.मुख्यमंत्र्यांच्या मंजूरीसाठी सादर करण्याची पध्दत यापुढेही सुरु राहील.

जिल्हाधिकारी कार्यालय ... दिनांक
शाखा:- EST
आवक नं.:- 22409 / 169
2 8 APR 2008
विशेष नोंद
कार्य विभाग

K.W.S.O. 2/5

ज्या प्रकरणात शासनाव्यतिरिक्त अन्य शिस्तभंग विषयक प्राधिकारी / नियुक्ती प्राधिकारी असतील त्याबाबतीत संबंधित शिस्तभंग विषयक प्राधिकारी/नियुक्ती प्राधिकारी यांनी संबंधित प्रशासकीय विभागाच्या सहमतीने वरील बाबी विचारात घेऊन निलंबनाबाबत निर्णय घ्यावेत, या सध्याच्या कार्यपध्दतीत बदल करण्यात येत असून क्षेत्रीय स्तरावरील सर्व गट "क" व "ड" संवर्गातील शासकीय सेवकांच्या निलंबन प्रकरणांचा आढावा व पुन:स्थापनेबाबतचे अधिकार त्या त्या महसूली विभागातील विभागीय आयुक्तांना प्रदान करण्यात येत आहे. विभागीय आयुक्तांनी आपल्या विभागातील गट "क" व "ड" संवर्गातील निलंबित शासकीय सेवकांच्या निलंबन प्रकरणांचा आढावा सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दिनांक २० जुलै, २००६ व दिनांक १८ ऑक्टोबर, २००७ मधील तरतुदी व मार्गदर्शक तत्वांच्या अधिन राहून घ्यावा.

*मंत्रालयीन स्तरावरील गट "क" व "ड" संवर्गातील कर्मचाऱ्यांसाठी सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दिनांक २० जुलै, २००६ व दिनांक १८ ऑक्टोबर, २००७ मधील तरतुदी व मार्गदर्शक तत्वांनुसार संबधित प्रशासकीय विभागांनी कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईट वर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००८०३१४१२२७१४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्र.ल.पाठक)
उप सचिव महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव व स्वीय सहायक,
मुख्य सचिव/सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव मंत्रालयीन विभाग
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
* प्रबंधक, उच्च न्यायालय ( अपील शाखा), मुंबई
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख/ प्रादेशिक विभागप्रमुख
निवड नस्ती. *पत्राने